# देगलूर महाविद्यालयात नेट-सेट परीक्षेवर १४ मार्च रोजी कार्यशाळा

देगलूर- देगलूर महाविद्यालयातील लोकप्रशासन, रसायनशास्त्र व भौतिक शास्त्र विभागाच्यावतीने दि. १४ मार्च २०२३ रोज़ी नेटसेट परीक्षेची तयारी कशी करावी? या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या राष्ट्रीय कार्यशाळेत वरिष्ट महाविद्यालय अथवा विद्यापीठात प्राध्यापक होऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांना निःशुल्क मार्गदर्शन करण्यात येणार आहे. नेट-सेट परीक्षेत यश संपादन करण्यासाठी अभ्यासक्रमाचे स्वरूप व व्याप्ती, प्रश्नपत्रिकेचे स्वरूप, टाईम म्यानेजमेंट, इत्यादी विषयावर मार्गदर्शन लाभणार आहे.

लोकप्रशासन विभाग व द फोरम ऑफ पब्लिक एडमिनिस्ट्रेशन प्रोफसर्स, एडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर्स अण्ड स्कॉलर्स यांच्या एमओयू अंतर्गत कार्यशाळा आयोजित करण्यात आंली आहे. प्रस्तुत एक दिवशीय राष्ट्रीय कार्यशाळा ऑनलाईन व ऑफलाईन असे दोंन्ही पद्धतीने सहभागी होता येईल. सर्व विषयातील विद्यार्थ्याना पेपर क्र. एक हा समान असुन त्याचा लाभ सर्व विद्याशाखा व विषयातील विद्यार्थ्याना होणार आहे. पदव्यूत्तर शिक्षण घेणाऱ्या व नेट-सेटची तयारी करणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी प्रस्तुत कार्यशाळेसाठी नाव नोंदणी महाविद्यालयाच्या वेबसाईटवरील लिंकद्वारे करुण जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा. असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ व संयोजन समितीने केले आहे.

Scanned with OKEN Scanner